| | |
|---|---|
| दाखल तारीख | ०४.०४.२०१२ |
| नोंदणी तारीख | ०४.०४.२०१२ |
| निकाल तारीख | १०.०३.२०२६. |
| कालावधी | वर्ष महिना दिवस |
| | **१३ ११ ०६** |

**मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर यांचे न्यायालयात**

(**पीठासीन अधिकारी एम. एम. गादिया**)

**नियमित फौजदारी खटला क्र. ३११/२०१२.**

**CNR No. MHKO030016452012.** **नि.९७/ब.**

**गुन्हा क्रमांक १५४/२०११.**

**महाराष्ट्र शासन तर्फे शाहूपुरी पोलीस ठाणे, कोल्हापूर.** .. **अभियोग पक्ष**

***विरुध्द***

१. **साहिद महंमद अब्दुलहुसेन**(फरारी)
वय :२६ वर्षे, धंदा : ड्रायव्हर,
रा. लेखीनदिन हायस्कुल, कलकत्ता.
सध्या प्रियदर्शनी कॉलनी, रसिका गार्डनच्या पाठीमागे, कोल्हापूर.

२. **श्रीमती चंद्रकला सुभाष दिक्षीत,**
वय : ५५ वर्षे, धंदा : घरकाम,
रा. प्रियदर्शनी
कॉलनी, रसिका गार्डनच्या पाठीमागे,
कोल्हापूर

.. **आरोपी**

........................................................................................................

अभियोगपक्षातर्फे सरकारी अभियोक्ता – श्री. ए. एन. डोईफोडे.

आरोपी क्र.२ तर्फे विधीज्ञ – श्री. के. पी. राणे.

........................................................................................................

## न्यायनिर्णय

( दिनांक १०.०३.२०२६ )

प्रस्तुत खटल्यात आरोपींविरुध्द अनैतिक व्यापार (निवारण) अधिनियम, १९५६ मधील कलम ३, ४, ५ व ८ खालील गुन्हयांसाठी दोषारोपपत्र ठेवण्यात आलेले आहे.

**०२.** अभियोगपक्षाची थोडक्यात हकिकत अशी की, दि.२४.१२.२०११ रोजी रात्री ८.०० ते दि.२६.१२.२०११ रोजी सकाळी ९.०० या दरम्यान शाहुपूरी पोलिस ठाण्याच्या पोलिस पथकाने कोल्हापूर येथील प्रियदर्शनी कॉलनीतील रसिका गार्डनच्या पाठीमागे असलेल्या आरोपी क्र.२ नामे चंद्रकला सुभाष दिक्षित हिच्या घरी छापा टाकला असता, फरार आरोपी क्र.१ व ती महिलांना वेश्या व्यवसायासाठी प्रोत्साहीत करुन कुंटनखाना चालवून त्यावर आपली उपजिवीका करीत असलेचे दिसून आले. सदर छाप्यादरम्यान पोलिस पथकाने विहित व आवश्यक पंचनामे केले. सदर घटनेबाबत फिर्यादी पिडीत महिलेने दि.२७.१२.२०११ रोजी शाहुपूरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. सदर फिर्यादीनुसार आरोपींविरुध्द गुन्हा क्र.१५४/२०११ नोंदविण्यात येऊन, त्यांना अटक करण्यात येवुन, त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

**०३.**आरोपी क्र.१ हा फरार असल्यामुळे, माझ्या विव्दान पुर्वाधिका–यांनी आरोपी क्र.२ विरुध्द दोषारोप(नि.२७) तयार केला, व सदर दोषारोपातील सर्व मजकूर सदर आरोपीस तिच्या मायबोलीत वाचुन व समजावुन सांगणेत आला असता, तिने गुन्हा नाकबुल करुन चौकशीची मागणी केली. सदर आरोपीने आपल्या बचावात

अभियोगपक्षाची सर्व हकिकत नाकारुन, तीस खोट्या गुन्हयात गोवण्यात आलेचे नमूद केले आहे.

**०४.**वादप्रश्न व त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत,

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपी क्र.२ हिने फरार आरोपी क्र.१ शी संगणमत करुन आपले घर, कुंटणखाना चालविणेसाठी वापरले, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **--- नाही.** |
| २. | आरोपी क्र.२ हिने फरार आरोपी क्र.१ शी संगणमत करुन महिलांना वेश्यव्यवसायास प्रवृत्त केले, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **--- नाही.** |
| ३ | आरोपी क्र.२ हिने फरार आरोपी क्र.१ शी संगणमत करुन महिलांना वेश्या व्यवसायासाठी कुंटणखान्यात दाखल करुन घेतले, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **--- नाही.** |
| ४. | आरोपी क्र.२ हिने फरार आरोपी क्र.१ शी संगणमत करुन फिर्यादीस वेश्या व्यवसायासाठी फुस दिली, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **--- नाही.** |
| ५. | काय आदेश ? | **आरोपी क्र.२ हीस निर्दोष मुक्त करण्यात आले व फरारी आरोपी क्र.१ यास दोषमुक्त करण्यात आले.** |

## कारणमीमांसा

**०५.**दोन्ही बाजुंच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. आपल्या हकिकतीच्या पृष्ठर्थ, अभियोगपक्षाने सदाशिव(अ.सा.१), हरिष(अ.सा.२), जोतीबा(अ.सा.३), जाधव(अ.सा.४), मोरे(अ.सा.५) व तपासी अंमलदार रजपुत(अ.सा.६) यांच्या साक्षी(अनुक्रमे नि.३३, ३९, ४०, ४२, ४६ व ६९) घेतल्या आहेत. अभियोगपक्षाने दिनांक २९.१२.२०१२ रोजीच्या स्थळपंचनामा (नि.२४), व दि.२७.१२.२०११ रोजी फिर्याद(नि.४७) या कागदपत्रांचा आधार घेतला आहे.

**<u>वादप्रश्न क्र.१ ते ४ करिता,</u>**

**०६.**सदर वादप्रश्न हे परस्परांशी निगडीत असल्यामुळे, सदर वादप्रश्नांचे विश्लेषण सोईसाठी एकत्रीतपणे करण्यात येत आहे. सदाशिव(अ.सा.१) हा दि.२९.१२.२०११ रोजीच्या घटनास्थळाचा स्थळ पंच आहे. सदर साक्षीदाराच्या कथनानुसार(नि.३३), पोलिसांनी दि.२९.१२.२०११ रोजी मार्केट यार्ड समोरील एका बंगल्याचा पंचनामा केलेला होता. त्याच्या कथनानुसार, त्यामध्ये खोल्या व बाकी काहीही नव्हते. हरिष(अ.सा.२) या ऐकिव माहितीआधारे साक्षी देणा-या साक्षीदाराने आपल्या साक्षीत(नि.३९) असे नमुद केले आहे की, आरोपी क्र.२ ही मार्केट यार्डात तिच्या घरासमोर राहते. घटनेदिवशी तीन इसम आले व त्यांनी गल्लीतील बायकांना आरोपी क्र.२ चा पत्ता विचारला. आरोपी क्र.२ ही आपल्या घरी महीलांना आणून वेश्या व्यवसाय करत होती. त्यामुळे आरोपी क्र.२ चा त्रास वाढलेला होता. त्यामुळे दंगा झालेला होता. सदर साक्षीदाराची साक्ष ही घटनेबाबत तारीख, व वेळसह तपशिलवार नाही. त्याने ऐकीव माहिती आधारे साक्ष दिलेचे दिसून येते. जोतिबा(अ.सा.३) यानेही आपल्या साक्षीत(नि.४०) ऐकिव माहिती आधारेच साक्ष दिलेली आहे, व तो घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार दिसून येत नाही.

०७.तपासी अंमलदार जाधव(अ.सा.४) हिने आपल्या साक्षीत(नि.४२), दि.२९.१२.२०११ रोजी घटनास्थळ पंचनामा केलेबाबत, पिडीत व इतर साक्षीदारांचे जबाब नोंदविलेबाबत औपचारिक कथन केलेले आहे. शाहुपूरी पोलिस ठाण्यातील तत्कालीन ठाणे अंमलदार सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक मोरे (अ.सा.५) यांनी फिर्याद(नि.४७) दि.२७.१२.२०११ रोजी फिर्यादीने दिलेल्या कथनाप्रमाणे लिहून घेतलेचे नमुद केले आहे. तपासी अंमलदार रजपूत(अ.सा.६) यांनी आपल्या साक्षीत(नि.६९), तपासादरम्यान, घटनास्थळावरील जागेचे मालमत्तापत्र व नकाशा प्राप्त करणेसाठी भूमी अभिलेख विभागास पत्र दिलेबाबत व तपासाअंती दोषारोपपत्र दाखल केलेबाबत नमूद केले आहे.

०८.छाप्यापूर्वी संबंधित गि–हाईक, पंच व पोलिस कर्मचारी यांना देण्यात आलेल्या सुचनांबाबत म्हणजेच छापापूर्व कारवाईबाबत व छाप्यादरम्यानच्या कारवाईबाबत अभियोगपक्षाने कोणताही पंचनामा शाबीत केलेला नाही. अभियोगपक्षाने कोणतीही पिडीत महिला व बनावट गि–हाईक यांची साक्ष घेतलेली नाही. अभियोगपक्षाने पिडीत महिला फिर्यादीचीही साक्ष घेतलेली नाही. कोणत्याही तपासी अंमलदाराने छाप्यादरम्यान काय प्रकारे कारवाई करण्यात आली, याचा कोणताही तपशील आप–आपल्या साक्षीत दिलेला नाही. प्रत्यक्ष छापा कारवाईबाबत अभियोगपक्षाने कोणताही पुरावा दिलेला नाही. अभियोगपक्षास पुरेशी संधी असतानाही, अभियोगपक्षाने सदरचे महत्वपूर्ण पुरावे घेतलेले नाहीत व त्याबाबतचे कारण अभियोगपक्षासच माहित असणार आहे. या एकंदरीत परिस्थितीत, आरोपी क्र.२ ही अनैतिक व्यापारासाठी महिलांना प्रवृत्त करत होती किंवा फुस देत होती, कुंटणखाना चालवित होती, व त्यावर आपली उपजिवीका करत होती, याबाबत प्रत्यक्षदर्शी व अविश्वनीय असा कोणताही पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही. परिणामतः आरोपी क्र.२ विरुध्दचे अनैतिक व्यापार (निवारण) अधिनियमातील

कलम ३, ४, ५ व ८ खालील गुन्हे शाबीत झालेले नाहीत. म्हणून वादप्रश्न क्र.१ ते ४ चे निष्कर्ष नकारार्थी असे आहेत.

**वादप्रश्न क्र.५ बाबत :–**

**०९.**मी वादप्रश्न क्र.१ ते ४ ला दिलेल्या नकारार्थी निष्कर्षांचा विचार करता, आरोपी क्र.२ ही निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. फरार आरोपी क्र.१ विरुध्द अभियोगपक्षाच्या पुराव्यात काहीही असलेले नसल्यामुळे, त्याच्याविरुध्द जुना खटला व चौकशी प्रलंबित ठेवून कोणतीही फल निष्पती होणार नाही. म्हणून, फरार आरोपी क्र.१ हा ही दोषमुक्त होण्यास पात्र आहे. अपिल कालावधीनंतर, एम.एच.०९–बी.एम–२४३२ या नोंदणी क्रमांकाच्या जप्त मारुती व्हॅनबाबतचा अंतरिम निर्गती आदेश कायम करण्यात येत आहे. परिणामतः वादप्रश्न क्र.५ चे निष्कर्षादाखल, मी खालील आदेश पारित करित आहे,

**आदेश**

१. आरोपी क्र.२ हीस अनैतिक व्यापार (निवारण) अधिनियम, १९५६ मधील कलम ३, ४, ५ व ८ खालील गुन्हयांमधुन फौजदारी प्रक्रिया संहीता, १९७३ मधील कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात आले आहे.

२. फरार आरोपी क्र.१ यास फौजदारी प्रक्रिया संहीता, १९७३ मधील कलम २३९ नुसार दोषमुक्त करण्यात आले आहे.

३. आरोपी क्र.२ चा जामिनकतबा रद्द करण्यात येवुन तिस स्वातंत्र्य बहाल करण्यात आले आहे.

४. फरार आरोपी क्र.१ विरुध्दचे अजामीनपात्र वॉरंट परत मागविण्यात यावे.

नि. ९७

५. अपिल कालावधीनंतर, एम.एच.०९–बी.एम–२४३२ या नोंदणीक्रमांकाच्या जप्त मारुती व्हॅन अंतरिम निर्गती आदेश कायम करण्यात आलेला आहे.

Digitally signed by MAHAVEER MOTICHAND GADIYA
Date: 2026.03.11 16:36:33 +0530

कोल्हापूर. **(एम. एम. गादिया)**

दिनांकः १०.०३.२०२६. मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर.

## खटल्याचा सारांश

| | | |
|---|---|---|
| १. | गुन्हा घडलेली तारीख | २४.१२.२०११ ते २६.१२.२०११ |
| २. | प्रथम खबर | २७.१२.२०११ |
| ३. | दोषारोप/ पत्र दाखल तारीख | ०४.०४.२०१२ |
| ४. | दोषारोप तारीख | १३.११.२०१८ |
| ५. | पुरावा सुरु झालेची तारीख | १०.१०.२०१९ |
| ६. | कोणत्या तारखेला निकालासाठी ठेवले | १०.०३.२०२६ |
| ७. | निकाल तारीख | १०.०३.२०२६ |
| ८. | शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | नाही. |

## आरोपी विषयी माहिती

| अ. क्र. | आरोपींची नावे | अटक तारीख | जामीनावर सुटलेली तारीख | केलेले गुन्हे | निर्दोष किंवा शिक्षा | दिलेली शिक्षा | फौजदारी दंड संहितेच्या कलम ४२८ साठी खटल्यादरम्यान ताब्यात घेतलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | साहिद महमंद अब्दुलहुसेन (फरारी) | २८.१२.२०११ | १६.०२.२०१२ | अनैतिक व्यापार (निवारण) अधिनियम, १९५६ मधील कलम ३, ४, ५ व ८ | दोषमुक्त करण्यात आले. | .... | .... |
| २ | श्रीमती चंद्रकला सुभाष दिक्षीत | २९.१२.२०११ | २५.०१.२०१२ | .....''.... | निर्दोष मुक्तता | .... | .... |

 नि. फौ. खटला क्र.३११/२०१२(न्याय.)

नि. ९७

## फिर्यादी/बचाव/ न्यायालयीन साक्षीदारांची यादी

**(अ) – अभियोग पक्षातर्फे साक्षी यादी –**

| अ.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | सदाशिव दादोबा सुतार(अ.सा.१) | स्थळपंच साक्षीदार(नि.३३) |
| २. | हरिष विश्वनाथ बाम(अ.सा.२) | साक्षीदार(नि.३९) |
| ३. | जोतीबा राजाराम पोवार(अ.सा.३) | साक्षीदार(नि.४०) |
| ४. | विद्या भिमराव जाधव(अ.सा.४) | तपासी अमंलदार(नि.४२) |
| ५. | कुमार सदानंद मोरे(अ.सा.५) | साक्षीदार(नि.४६) |
| ६. | रतनसिंग भगवानसिंग रजपुत(अ.सा.६) | साक्षीदार(नि.६९) |

(ब) – बचाव पक्षातर्फे साक्षीदार – निरंक

(क) – न्यायालया तर्फे साक्षीदार – निरंक

## फिर्यादी/बचाव/ न्यायालयीन निशाणी क्रमांक –

(अ) – अभियोग पक्षातर्फे निशाणी – निरंक

(ब) – बचाव पक्षातर्फे निशाणी – निरंक

(क) – न्यायालयातर्फे निशाणी – निरंक

(ड) – भौतिक वस्तू – निरंक

Digitally signed by MAHAVEER MOTICHAND GADIYA
Date: 2026.03.11 16:36:41 +0530

कोल्हापूर. **(एम. एम. गादिया)**

दिनांकः १०.०३.२०२६. मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर.